SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२३-२४/ 67 दिनांक : 07/02/2025

## स्मरणपत्र क्रमांक ३

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२३-२४**
Web DCF मध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ :** १) या कक्षाचे जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२३-२४/६६ दि.०३/०२/२०२५ रोजीचे स्मरणपत्र क्रमांक २.
२) या कक्षाचे जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२३-२४/६४ दि.२३/०१/२०२५ रोजीचे स्मरणपत्र क्रमांक १.
३) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२३-२४/५९, दि.१९/१२/२०२४ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.
४) मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२३-२४/२०२४ दि.१२/१२/२०२४ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२३-२४ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०८/१२/२०२४ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२३-२४ करीता माहिती नोंद करावयाची आहे. सदरची माहिती **दिनांक ३१/०१/२०२५** पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ४ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेले होते.

सदर माहितीचा आढावा घेतला असता आपल्या महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर अद्याप नोंद केलेली दिसुन येत नाही. **सदर वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्याची अंतिम मुदत दि. १०/०२/२०२५ पर्यंत देण्यात आलेली आहे. सदर मुदतीत माहिती नोंद न केल्यास** आपले महाविद्यालय अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या वेबपोर्टेलवर माहिती नोंद न करणाऱ्या महाविद्यालयांच्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. **असे झाल्यास शिष्यवृत्ती बाबतचे कोणतेही काम होणार नाही तसेच NAAC ला सामोरे जाण्यास आपल्या महाविद्यालयास अडचणी उद्भवतील.** वेबपोर्टलवर माहिती नोंद न केल्यास होणाऱ्या सर्व कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया आपण नोंद घ्यावी.

**वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**